# डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.

**DNS BANK (मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)**

अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे।

वसुली विभाग : ''मधुकुंज'', २रा मजला, प्लॉट क्र. पी-५२, एम.आय.डी.सी फेज-II, कल्याण शिळ रोड, डोंबिवली (पूर्व)-४२१२०४. वेबसाईट: www.dnsbank.in, ई-मेल आयडी : recovery@dnsb.co.in

## जाहीर लिलाव नोटीस (पुनर्लिलाव सूचना)

३०.०६.२०१७ रोजीस रु. ७,२८,२२,७६७.८३ (रुपये सात करोड अठ्ठावीस लाख बावीस हजार सातशे सदुसष्ट आणि पैसे त्र्याऐंशी मात्र) अधिक सांपार्श्विक दराने त्यावरील पुढील व्याज सह कर्जाच्या वसूलीपर्यंत परिव्यय, प्रभार आणि खर्चाच्या वसुलीकरिता त्यांना मंजूर केलेल्या अग्रिमांकरिता कर्जदार म्हणजेच मे. राज फ्लेक्सी प्रिन्ट स्टिक प्रा. लि. यांच्या डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेड (बँक) कडे गहाण खालील नमूद मिळकतीची **सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफैसी ॲक्ट) आणि त्याअंतर्गत केलेल्या नियमान्वये** जाहीर लिलावाने विक्री. बँकेकडे सदर सरफैसी अधिनियम अंतर्गत तारण मत्तेचा प्रत्यक्ष कब्जा आहे. बँकेने तिच्या देयच्या वसुलीकरिता पुढील मिळकतीचा जाहीर लिलाव घेण्यास ठरविले आहे.

| मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत (रु. लाखात) | इअर (रु. लाखात) | निरीक्षणाची तारीख आणि वेळ | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|
| गाव धोवली, पापडी, तालूका वसई, जिल्हा पालघर येथे स्थित असलेले आणि वसलेले सर्व्हे क्र. १०४ आणि हिस्सा क्र. ए/१ पैकी इंडस्ट्रीअल क्षेत्र मध्ये भाडेपट्टाधारक प्लॉट क्र. ७८ आणि ७९ मोज. ५०० चौ.मीटर्स प्रत्येकी, एकूण मोजमापित १००० चौ.फू. | १३०.०० | १३.०० | ०६.०६.२०२४ स. ११.०० वा. ते सं. २.०० वा. | १४.०६.२०२४ स. ११.०० वा. पासून |
| **लिलावाचे ठिकाण : वसुली विभाग, स्थित येथे मधुकुंज, २ रा मजला, पी-४२, फेझ II, एम.आय.डी.सी., कल्याण शिळ रोड, सोनारपाडा, डोंबिवली (पूर्व), जिल्हा ठाणे ४२१२०४** | | | | |

**अटी आणि शर्ती:-**

१. प्लॉटच्या विक्रीच्या अटी आणि शर्ती असलेली बोली प्रपत्र २ रा मजला, पी-५२, फेझ II, एम.आय.डी.सी. कल्याण शीळ रोड, सोनारपाडा, डोंबिवली (पूर्व), जिल्हा ठाणे ४२१२०४ येथे स्थित आमच्या वसुली विभागातून कोणत्याही कामाच्या दिवशी स. १०.०० व सं. ५.०० दरम्यान मिळू शकतील.

२. बोली मुंबई येथे देय डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेड च्या नावातील काढलेल्या कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा शेड्युल्ड बँकेच्या आरटीजीएस/एनईएफटी/पे ऑर्डर/डिमांड ड्राफ्ट च्या स्वरूपातील येथे वर नमूद केल्याप्रमाणे इसारा अनामत रक्कम (ईअर) सह मोहोरबंद पाकितातून रितसर भरलेले बोली प्रपत्र १३.०६.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी दु. ४.०० वा. पूर्वी बँकेच्या मुंबई शाखेकड पोहोचले पाहीजे. इअर शिवाय आणि/किंवा राखीव किंमतीच्या खाली बोली ग्राह्य धरली जाणार नाही. बोलीचा मोहोरबंद लिफाफा वरील उल्लेखित ठिकाणी आणि तारखेस उघडण्यात येतील.

३. बोली प्रपत्रासह बोलीदारांनी केवायसी दस्तावेजांच्या निवासस्थानाच्या पुराव्यांच्या म्हणजेच पॅनकार्ड/आधार इं. च्या स्व-साक्षांकित छायाप्रती व एक पारपत्र आकाराचे छायाचित्र सादर केले पाहीजे.

४. बोलीदारांनी व्यक्तीशः लिलावांत सहभागी होणे आवश्यक आहे. तथापि, बोलीदारांनी त्याच्या/तिच्या/त्यांच्या वतीने सहभागी होण्याकरिता कोणत्याही व्यक्तीला प्राधिकृत केले असल्यास अशा प्राधिकृत व्यक्तीने त्याच्या/तिच्या नावांत बोलीदारांनी जारी केलेले प्राधिकृत पत्र/संचालक मंडळाचा ठराव प्रस्तुत करणे आवश्यक आहे.

५. मिळकतीची विक्री ही ''जे आहे जेथे आहे आणि जे आहे जसे आहे तत्त्वावर'' काटेकोरपणे आहे आणि इच्छुक बोलीदार हे कोणताही दावा, प्रभार, कर, लेविसेस, थकीत आणि/किंवा प्लॉटविरुद्ध उपार्जित कोणतेही इतर दायित्त्व काही असल्यास, यासंदर्भात त्यांची स्वतःची चौकशी करू शकतात. असे दायोत्व सदर यशस्वी बोलीदारांना सहन करावे लागणार आहे. प्लॉटवर कोणतेही विद्यमान उपार्जित दायित्त्व असल्यास बँकेला माहित नाही.

६. लिलाव प्रक्रियेत सर्वात जास्त बोली मिळाल्या रकमेपासून सुरूवात होईल आणि त्यानंतर दोन्ही प्लॉट च्या बाबतीत प्रत्येक बोलीदाराला रु. १,००,०००/- च्या किमान रकमेने बोली वाढविण्याची परवानगी देण्यात येईल.

७. यशस्वी बोलीदारांना त्यांची बोली स्वीकारल्यावर म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवशी त्याला/तिला/त्यांना सायं. ५.०० च्या आधी बोली रकमेच्या २५% देय (इअर धरुन) त्वरित भरावी लागणार आहे आणि उर्वरित रक्कम लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसांत भरावी लागेल.

८. जर वरील खंड (७) मधील नमूद बोली रकमेचे २५% प्रदान करण्यास यशस्वी बोलीदार कसूरवार ठरल्यास, त्याने/तिने/त्यांनी भरलेली इसारा रक्कम जप्त केली जाईल आणि विक्री ही रद्दबातल केल्याचे गृहीत धरले जाईल, तसेच जर विक्री निश्चितीच्या तारखेपासून १५ दिवसांत संपूर्ण रक्कम चुकती करण्यास बोलीदार कसूरवार ठरल्यास बोली रकमेच्या २५% रक्कम बँक जप्त करेल.

९. यशस्वी बोलीदार बँकेच्या नावे टीडीएस म्हणून विक्री किंमतीची १% वजा करुन आणि सदर विहित कालावधीत आयकर विभागाकडे सादर करावे. बँकेचे पॅन तपशिल यशस्वी बोलीदाराकडे देण्यात येईल. वरील प्रमाणे टीडीएसच्या प्रदानानंतर त्वरीत यशस्वी बोलीदार बँकेकडे प्रपत्र क्रमांक २६क्युबी च्या चलान-नी-विवरणच्या एक प्रती सादर करतील.

१०. वरील खंड ७ मध्ये वर्णन केल्या प्रमाणे संपूर्ण बोली रक्कम प्राप्त झाल्यानंतर, बँक यशस्वी बोलीदारांच्या नावात विक्री विलेख बनवेल आणि यशस्वी बोलीदारांना सर्व कर, मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क आणि अनुषंगिक खर्च यशस्वी बोलीदारांच्या नावे नोंदणीकृत विक्री प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सहन करावे लागणार आहे. यशस्वी बोलीदार त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे प्लॉट्स हस्तांतर करण्यासाठी एकमेव जबाबदार असेल.

११. निर्धारित मुदतीत संपूर्ण बोली रक्कम प्राप्त झाल्यानंतर प्लॉटचा कब्जा खरेदीदारांच्या सुपूर्द केला जाईल.

१२. कोणतेही कारण न देता कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव/बोली फेटाळण्याचे किंवा लिलाव पुढे ढकलण्याचे/रद्द करण्याचे आणि त्याचप्रमाणे कोणत्याही पूर्व सूचने शिवाय विक्रीच्या अटी आणि शर्ती बदलण्याचे तिचे अधिकार बँक राखून ठेवत आहे.

१३. इच्छुक बोलीदार प्राधिकृत अधिकारी मोबाईल क्र. ९८७०९९५६२१/९८७०९९५६२५ येथे संपर्क साधू शकतात.

सही/-
केतन यु. पुरव
प्राधिकृत स्वाक्षरीकार
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.

ठिकाण: डोंबिवली
दिनांक: २७.०५.२०२४